जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
3 0 JUL 2017
पुढारी



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र विभागाचे विद्यार्थी परिसराची स्वच्छता करताना.

# पत्रकारिता विद्यार्थ्यांची विद्यापीठात स्वच्छता

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांनी शनिवारी विद्यापीठ परिसरात स्वच्छता मोहीम राबविली. एक तासाहून अधिक काळ विद्यार्थ्यांनी श्रमदान करून परिसर स्वच्छ केला.

शिवाजी विद्यापीठाच्या सर्वच अधिविभागाच्या विद्यार्थ्यांकडून स्वच्छता मोहीम राबविण्यात येत आहे. वृत्तपत्रविद्या विभागातील बी. जे. सी. आणि एम. जे. सी. चे विद्यार्थी शनिवारच्या मोहिमेत सहभागी झाले. मानव्यशास्त्र इमारतीच्या पूर्व बाजूला असलेली झुडपे, वाढलेले गवत विद्यार्थ्यांनी काढले. अनेक झाडांची छाटणी करण्यात आली. अस्ताव्यस्त पडलेला कचरा उचलण्यात आला. विभागातील सहायक प्राध्यापक डॉ. शिवाजी जाधव यांच्यासह कार्यालयीन कर्मचारीही मोहिमेत सहभागी झाले होते.

30 JUL 2017 तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सायबरमध्ये आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन

- डॉ. यू. एम. देशमुख व डॉ. एम. एम. अली यांची माहिती
- जागतिक व्यवसायांचे प्रश्न व आव्हाने' विषयावर परिषद
- ८० शोधनिबंध होणार सादर
- परिषदेतून निघणारा निष्कर्ष अर्थमंत्र्यांना कळविणार

प्रतिनिधी
कोल्हापूर

छत्रपती शाहू इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस एज्युकेशन अॅन्ड रिसर्चच्या वतीने 'जागतिक व्यवसायांचे प्रश्न व आव्हाने' या विषयावर सायबर कॅम्पस येथे आयोजन केले आहे. ४ व ५ ऑगस्टला आंतरराष्ट्रीय परिषदेच्या निमित्ताने या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे, अशी माहिती परिषदेचे सचिव डॉ. यू. एम. देशमुख आणि संयोजक डॉ. एम. एम. अली यांनी पत्रकार परिषदेत दिली.

याबाबत अधिक माहिती देताना डॉ. यु. एम. देशमुख यांनी सांगितले की, भारताचे ठोक राष्ट्रीय उत्पादन १२५ लाख करोड असून समांतर आर्थिक उलाढाल २३ टक्के अर्थात, २८ लाख करोड इतकी आहे. यातील बराचसा पैसा हा सोने, स्थावर आणि रोख रोकडयामध्ये गुंतलेला आहे. यापैकी ६८ टक्के रकम पाचशे आणि एक हजार रूपयांच्या नोट रूपात ठेवला जात होता. सुमारे ३ लाख करोड रुपयांचे चलन भारताच्या शुभ्र अर्थव्यवस्थेत समाविष्ट होऊ शकते. जी रक्कम १०० देशांच्या ठोक राष्ट्रीय उत्पन्नाइतकी आहे. या पार्श्वभूमीवर संबंधित विषयावर खुली चर्चा व विचार मंथन होणे आवश्यक आहे. अर्थात, नोटाबंदीनंतर सामान्य नागरिकांवर झालेला, या हेतूने सायबरमध्ये आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे.

डॉ. एम. एम. अली म्हणाले, ४ रोजी सकाळी साडेदहा वाजता परिषदेचे उदघाटन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते होईल. परिषदेत क्वीन्स विद्यापीठ–इंग्लंड, हैदराबाद, कर्नाटक, पुणे, मुंबई आदी ठिकाणांहून तज्ज्ञ व संशोधक सहभागी होणार आहेत. प्रमुख वक्ते म्हणून लंडन येथील डॉ. सुशांत मलिक हे उपस्थित राहतील. तर प्रमुख पाहुणे म्हणून पुणे येथील गोखले इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटिक्स अॅन्ड इकॉनॉमिक्सचे संचालक प्रो. राजस परचुरे हे असतील. दोन दिवस चालणाऱ्या या परिषदेतील विविध सत्रात सुमारे ८० शोधनिबंध सादर केले जाणार आहेत.